उप. मु. का. अ. (बा. क.)
ए, वा, वि, सं, यो पुणे.
आवक क्र. आसीं
तारीख 21 FEB 1994
उप मु. का. अ. (बा. क.)

जिल्हा परिषद, पुणे
आवक
16 FEB 1994
आवक लिपिक

क्रमांक एआयटी १०९४/१९६/सीआर १३०५/१३
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ११ फेब्रुवारी १९९४.

संचालक,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
कोकण भवन, नवी मुंबई

विषय:- पर्यवेक्षिका [आयसीडीएस] या पदाच्या आवश्यक पात्रतेबाबत.

वरील विषयाबाबतचे आपले क्रमांक एबाविसे/का१/१४८/९४ दि. ३१.१.९४ पत्र कृपया पहावे.

जिल्हा परिषदांमधील पर्यवेक्षिका [आयसीडीएस] या पदाचे सेवाप्रवेश नियम विहित करण्यात आले आहेत. त्यामुळे पर्यवेक्षिका [आयसीडीएस] या पदाचे सेवाप्रवेश नियम या विभागाकडून करण्यात आलेले नाहीत, हे आपले विधान वस्तुस्थितीवर आधारीत नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा [सेवाप्रवेश] नियम १९८७ मध्ये पर्यवेक्षिका[आयसीडीएस] या पदावर नाम निर्देशनाने नियुक्ती करण्यासाठी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण व अंगणवाडी सेविका म्हणून ७ वर्षाचा अनुभव अशीही एक तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार अंगणवाडी सेविका म्हणून ७ वर्षाचा अनुभव माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वीचा असला तरी त्या अंगणवाडी सेविका पर्यवेक्षिका [आयसीडीएस] या पदाच्या निवडीसाठी व नियुक्तीसाठी पात्र आहेत.

मात्र या विभागाने पर्यवेक्षिका [आयसीडीएस] या पदासाठी जे सेवाप्रवेश नियम विहित केले आहेत, ते जिल्हा परिषदांमधील पर्यवेक्षिका [आयसीडीएस] या पदाचे आहेत. त्यामुळे नगर पालिकांमधील किंवा शहरी क्षेत्रातील पर्यवेक्षिका [आयसीडीएस] ची पदे भरण्यासाठी या विभागाचे सेवाप्रवेश नियम लागू पडत नाहीत.

[सही]
[चं. म. अभ्यंकर]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी अग्रेषित.
१] सर्व विभागीय आयुक्त.
२] सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
३] सदस्य सचिव, महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ मुंबई
४] सर्व सदस्य सचिव, प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे.
५] अवर सचिव, महिला व बाल कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
६] अवर सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
७] कार्यासन क्र. १२, १४ व १५ ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
८] निवड नस्ती.